# प्रेसनोट

दि.२३.०४.२०१९

**शिर्षक** - तक्रारदार यांच्या मालकीचे बिनशेती प्लॉट हे वाणिज्यीक प्रयोजनार्थ करण्यासाठी आवश्यक असणारे ना हरकत प्रमाणपत्र देण्यासाठी २०,०००/- रूपये लाचेची मागणी करून स्विकारणारे श्री.धर्मराज राठोड, सरपंच , ग्रामपंचायत हत्तूर ,ता.दक्षीण सोलापूर यांना रंगेहात पकडले.

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग** | पुणे परीक्षेत्र, सोलापूर युनिट. |
| **गुन्हा नोंद क्रमांक** | फौजदार चावडी पोलीस स्टेशन, सोलापूर शहर, गुरनं /२०१९ |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा कलम ७ प्रमाणे. |
| **आरोपीचे नाव व कार्यालय** | धर्मराज गोपाळ राठोड, वय ४५ वर्षे, इलोसे, सरपंच, ग्रामपंचायत हत्तूर, ता. दक्षीण सोलापूर, जि.सोलापूर |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | २०,०००/- रूपये |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | २०,०००/- रूपये |
| **थोडक्यात माहिती** | यातील तक्रारदार यांची मौजे हत्तूर, ता.दक्षीण सोलापूर गावचे हद्दीमध्ये ३ एकर शेती असून सदर शेतीमध्ये प्लॉट पाडून बिनशेती केलेली आहे. परंतू सदर बिनशेती प्लॉट हे तक्रारदार यांना वाणिज्यीक प्रयोजनार्थ वापरण्यासाठी करावयाचे होते. ते प्लॉट वाणिज्यीक प्रयोजनार्थ करण्यासाठी ग्रामपंचायत हत्तूर यांचा ग्रामपंचायत ठराव व नाहरकत प्रमाणपत्र आवश्यक होते. सदर ठराव व नाहरकत प्रमाणपत्रावर सही करून देण्यासाठी २०,०००/- रूपये लाचेची मागणी सरपंच धर्मराज राठोड हे करीत असल्याबाबत तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो,सोलापूर कडे तक्रार नोंदवली होती.<br>त्यावरून सदर तक्रारीची दि.२३.०४.२०१९ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर कडून पडताळणी करण्यात आली होती. त्यामध्ये तक्रारदार यांच्याकडे सरपंच धर्मराज राठोड यांनी २०,०००/- रूपये लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाले होते. त्यानंतर सरपंच राठोड यांच्या विरूध्द सुराणा मार्केट,सोलापूर येथे लावण्यात आलेल्या लाचेच्या सापळ्यामध्ये तक्रारदार यांचेकडून श्री. धर्मा राठोड यांनी लाचेची रक्कम २०,०००/- रूपये स्विकारल्यानंतर रंगेहात पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास त्वरीत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,ग.रा.शी संपर्क करावा.

| | | |
|---|---|---|
| संपर्क पत्ता | :- | पोलीस उपअधिक्षक,ॲन्टी करप्शन ब्युरो, रंगभवन चौक, सोलापूर ४१३४०३. |
| संकेत स्थळ | :- | acbmaharashtra.gov.in |
| ई-मेल | :- | acbwebmail@mahapolice.gov.in |
| ऑनलाईन तक्रार ॲप | :- | acbmaharashtra.net |
| टोल फ्री क्रमांक | :- | १०६४ |
| दुरध्वनी क्रमांक | :- | ०२१७-२३१२६६८ |
| व्हॉटसॲप क्रमांक | :- | ९९३०९९७७०० |

सहा. पो. आयुक्त/पोलीस उप अधिक्षक

(अरुण देवकर )
सहा.पोलीस आयुक्त/ पोलीस उपअधीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, सोलापुर

Scanned by CamScanner